# पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट

प्रिय,

वैभवी रमेश गव्हाणे

संगमनेर, ता. भोर

सस्नेह नमस्कार,

आज तुझ्या हाती पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या शिष्यवृत्तीचे पत्र सोपवित असताना मला तुझी ताई म्हणून अतिशय आनंद होत आहे. 'मानवी जीवनात अमूलाग्र बदल करण्याचे सामर्थ्य फक्त शिक्षणात आहे' हे आपल्या सर्वांना माहिती आहे.

असाध्य ते साध्य, करीता सायास।
कारण अभ्यास, तुका म्हणे।।

आज परिस्थितीमुळे उच्चशिक्षण घेणा-यांचे प्रमाण निश्चितच कमी आहे. त्यातही मुलींची संख्या तुलनेने कमीच आहे. त्यातूनही जी मुलं-मुली शिकतात त्यांना सर्व सहज उपलब्ध झालेले नसते. त्यासाठी त्यांनी खूप कष्ट उपसलेले असतात.

आज तुझ्या आई वडिलांच्या दूरदृष्टीला चिकाटीला आणि सक्षम पालकत्वाला माझा नमस्कार. कारण आज तुम्ही सर्व इथे जे आहात आणि उद्या एका विशिष्ट उंचीवर असाल ते केवळ तुमच्या पालकांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे आणि जिद्दीमुळेच..!! अशाच सातत्यपूर्ण प्रयत्न करणाऱ्या पालकांचे ध्येयवेडे पाल्य म्हणून तुला तुझ्या उच्च शिक्षणासाठी या माध्यमातून एक छोटीशी मदत..... याद्वारे तुझी ताई म्हणून तुला मार्गस्थ करण्याचा एक छोटासा प्रयत्न ! या छोट्याशा मदतीने तुझ्या प्रयत्नांना हत्तीचे बळ यावे हिच सदिच्छा..!

तुला आवर्जुन एक गोष्ट सांगते की, कुटुंब म्हणून तुझ्या या प्रवासात मी तुझी हक्काची ताई म्हणून आणि पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कायम तुझ्या सोबत असेल. जिद्दीने प्रयत्न कर आणि आपल्या क्षेत्रात यशस्वी हो ! स्वत:सह कुटुंबाची काळजी घे आणि खूप नाव कमव...

तुला तुझ्या पुढील वाटचालीसाठी मनापासून खूप खूप शुभेच्छा !

तुझी,

सुप्रिया सुळे

सुप्रियाताई



Scanned with OKEN Scanner